IMPACT FACTOR : 3.0498

ISSN-2348-2702

Peer Reviewed

# APOORV KNOWLEDGE

## International Journal of Multidisciplinary Research

**ONE DAY MULTIDISCIPLINARY NATIONAL CONFERENCE**

**ON**


# INDIAN SOCIETY : PROBLEMS AND SOLUTIONS

• Organized by •

Shri. Dnyaneshwar Shikshan Sanstha's

## SHIVCHHATRAPATI ARTS COLLEGE

Pachod, Tq. Paithan, Dist. Aurangabad (M.S.)




**Vol - 2**

• EDITOR-IN-CHIEF •

Dr. Vandana Bankar

• EDITOR •

Dr. Hariprasad Bidve

Dr. Uttam Jadhav

One Day Multidisciplinary National Conference on

# Indian Society : Problems and Solutions

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

**Publisher**
**Bharat Jamdhade**
Apoorv Publishing House,
B-2/15, Sunny Center, Pisadevi Road, Aurangabad (M.S.)
Mob. - 9049591747, 8177803216
Email - apoorvjamdhade@rediffmail.com
bharatjamdhade1976@gmail.com

**DTP**
Dr. Yajuwendra Wankar
Mob. 9763830016

**Cover page**
Shlok Design, Bharat Bazar, Aurangabad

**Offset**
Rudrayani Offest, MIDC, Cidco, Aurangabad.

**Price :** 430/-

**Note :** The views expressed by the authors in their research papers in this book are their own. The Editor/ publisher is not responsible for them. Author is responsibile for all grammatical error Subject to Aurangabad (MS) Jurisdiction.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


| | | |
|---|---|---|
| 52. | मराठी कादंबरीवरील जागतिकीकरणाचा परिणाम<br>प्रा. डॉ. सदाशिव सरकटे | 176 |
| 53. | जागतिकीकरणानंतर उच्च शिक्षणाची झालेली दशा व दिशा<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | 179 |
| 54. | भटक्या विमुक्तांच्या साहित्याची सामाजिक पार्श्वभूमी<br>प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव | 182 |
| 55. | स्त्रीवादी साहित्याची संकल्पना<br>डॉ.यशोद श्रीमंतराव पाटील | 184 |
| 56. | दलित साहित्य चळवळ आणि भारतीय समाज<br>डॉ.आहिरे भास्कर मुरलीधर | 186 |
| 57. | जोतीराव फुलेंच्या विचारांचा अन्वयार्थ<br>प्रा.डॉ.काळे बी.एम. | 190 |
| 58. | धरणग्रस्तांच्या दुःखाची गाथा- झाडाझडती<br>प्रा.डॉ.मधुकर बैकरे | 193 |
| 59. | 1990 नंतरचे ग्रामीण कादंबरी लेखन<br>प्रा. डॉ. संतोष चव्हाण | 196 |
| 60. | महात्मा फुले यांचे साहित्य आणि समाज<br>प्रा. शिवाजी सिरसाठ | 199 |
| 61. | 'ग्रामोध्दाराचे अभंग'- ग्रामीण सामाजिक समस्या आणि उपाय<br>डॉ.संतोष शिवनाथ कानडे | 201 |
| 62. | मानवी जीवन : वाचन संस्कृती<br>प्रा.डॉ.तोटे दादासाहेब सर्जेराव | 203 |
| 63. | मराठी संत साहित्य आणि सामाजिक समस्या<br>प्रा. शेख आरिफ ताजुद्दीन | 205 |
| 64. | जागतिकीकरणाचा मराठी ग्रामीण कवितांवर पडलेला प्रभाव<br>सहा. प्रा. ढास रविंद्र बाबासाहेब | 207 |
| 65. | महात्मा फुले यांच्या साहित्याने भारतीय समाज व्यवस्थेवर केलेला सकारात्मक परिणाम<br>कु. लीना निळकंठराव उराडे | 20 |
| 66. | खेळात भाषेचे महत्व<br>डॉ.कैलास इंगळे | 21 |
| 67 | महात्मा फुले यांच्या विचारातील साहित्यप्रवाह<br>प्रा. मोहन सौंदर्य | 21 |
| 68 | वाचनसंस्कृतीच्या विकासातील अडसर व उपाय<br>श्रीमती. संगीता शेषराव नाटकर | 21 |

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


ISSN No. - 2348-2702, Impact Factor : 3.0498, Vol. II, 2nd March 2019

# जोतीराव फुलेंच्या विचारांचा अन्वयार्थ

प्रा.डॉ.काळे बी.एम.

मराठी विभाग कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

**प्रस्तावना :-**

महात्मा फुलेंच्या विचारांचा अन्वयार्थ लावण्याचे फार मोठे कार्य आंबेडकरोत्तर आंबेडकरवादी विचारकांनी केले. त्यामुळे "फुले यांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करण्याचे फार मोठे श्रेय दलित विचारवंतांना आहे." असे डॉ.गंगाधर पानतावणे नमूद करतात. कृतिशील विचारवंत व बंडखोर समजसुधार म्हणुन म.फुले सर्व जगाला परिचित आहेत. १८८४ ला मुलींसाठी पुण्यात पहिली शाळा काढून त्यांनी सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. स्वत:ची पत्नी सावित्रीबाई फुलेंना शिक्षिका बनवून आपल्या सामाजिक कार्यात सहभागी करून घेतले. १८५२ ला अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा काढणे, १८५६ ला कायद्याने पुनर्विवाहास मान्यता मिळाल्यानंतर पुण्याच्या सारबागेत पुनर्विवाह लावणे, विधवांचे केशवपन केले जाऊ नये. म्हणुन पुण्यातील न्हावी लोकांचा संप घडवून आणणे, अवैध संबंधातून होणाऱ्या मुलींची हत्या केली जाऊ नये म्हणून १८६६ ला `बालहत्या प्रतिबंध गृह` काढणे, सामान्यजनांसाठी १८७६ ला `सार्वनिक सत्यधर्माची` स्थापना करणे हा त्यांचया जीवनाचा चढला आलेख होय.

त्यांनी लेखनही विपुल केले. `तृतीय रत्न` हे नाटक (१८५५), `पवाडा छत्रपती शिवाजी भोसले यांचा` (१८६९), `ब्राम्हणांचे कसब` (१८६९), `गुलामगिरी` (१८७३), `शेतकऱ्यांचा असूड` (१८६३)`सत्सार` अंक १,२ (१८८५)`इशारा` (१८५५), `सार्वजनिक सत्यधर्म` (१८९१) आणि अखंडदी काव्यरचना करून त्यांनी स्त्री, शूद्रतिशूद्रांच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडली. त्यांच्या कार्याची महती संगताना शरणकुमार लिंबाळे म्हणतात, "महात्मा फुलेंचे कार्य हे प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देणारे होते.फुले दाम्पत्याने त्रास आणि छळ सहन करून समाजसेवा केली. समाजातील अंधश्रध्दा, बुवाबाजी, दैनय आणि दास्य ह्यांविरूध्द त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. सामान्य माणूस हा फुल्यांच्या कार्याचा आणि विचारांचा केंन्द्रविंदू होता." सामान्य माणूस केंन्द्रस्थानी ठेवून म.फुलेंनी लेखन आणि कार्य केले.

म.फुलेंच्या लेखनातील एक महत्वाचे सूत्र म्हणजे शूद्रतिशूद्र हे एतद्देशीय आहेत आणि आर्य (ब्राम्हण) हे परकीय आहेत. त्यांनी शूद्रांचा पराभव करून त्यांना गुलाम केले. या संदर्भात डॉ.गंगाधर पानतावणे म्हणतात, "शूद्र काय अतिशूद्र काय, हे एतद्देशीय होत, हा फुल्यांचा सिध्दांत आहे. इराणाकडुन आलेल्या आर्यांनी एतद्देशीयांवर आक्रमण करून त्यांस दास केले आणि स्वामित्व प्रस्थापित केले आणि एतद्देशीयांना नीच मानणे, हा आपला धर्म मानला. ही फुल्यांनी केलेली मीमांसा अर्धसत्य नाही याचा हवाला अनेक समाजशास्त्रज्ञांनी दिला आहे." पुढे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी चिकित्सक अभ्यास करून शूद्रतिशूद्र एतद्देशीय असून, ते राजे आपल्याचा निर्वाळा दिला आहे.

शूद्रातिशूद्रांवर कायमचे वर्चस्व ठेवण्यासाठी व उदरनिर्वाहाची कायमची सोय करण्यासाठी आर्यांनी बनावट धार्मिक ग्रंथांची निर्मिती केली, असे ते स्पष्टपणे सांगातात. ते म्हणतात, "भट लोक आपले पोट भरण्याकरिता आपले स्वार्थी ग्रंथातून वारंवार जागोजागी अज्ञानी शूद्र लोकांस उपदेश करतात, त्यामुळे त्यांच्या मनामध्ये त्याविषयी पूज्यबुध्दी उत्पन्न होऊन त्यास त्यांनी (भट लोकांनी) ईश्वरालाच मात्र जो योग्य सन्मान तो आणांस देवविण्यास लावले आहे, हा काही लहानसहान अन्याय नव्हे." धर्म आणि देव या दोन्ही बाबींचे भय सर्वसामान्य माणसांच्या मनावर बिंबवून त्यांना लुटल्याचे फुले स्पष्ट करतात. त्यांच्याच हातात लेखणी असल्यामुळे त्यांनी हिंदुस्थानचा इतिहास चुकीचा लिहिल्याचे ते सांगतात. बळीस्थानातील बळीचा इतिहास शोधताना त्यांनी इतिहासाचे पुनर्लेखन केले. न्यायाने, नीतीने राज्यकारभार करणाऱ्या बळीचे राज्य वामनाने कपटाने हरण केल्याचे ते स्पष्ट करतात. `गुलामगिरी` या ग्रंथातपण ते आर्यपूर्व लोकांचा जाणीवपूर्वक उल्लेख करून असुर, दस्यू, राक्षस इत्याइी आदिवासींच्या परंपरा हा मूळच्या देशी परंपरा असल्याचे स्पष्ट करतात. त्यामुळे भास्कर चंदनशिव एकवर्णीय भाकड इतिहासाला बाद करून समग्र इतिहासाचे पुनर्लेखन करण्याची गरज म.फुल्यांनी प्रतिपादल्याचे नमूद करतात. ते लिहितात. "प्रस्थापित इतिहास, संस्कृतीला उभा छेद देऊन, नव्याने बहुजनांचा इतिहास मांडण्याचे कार्य जोतीबारांनी ह्यातभार केले. आमचा इतिहास कुठाय ? आमची संस्कृती कोणती ? आमचे साहित्य का नाही ? हे सारे प्रश्न वरवर साधेसोपे

Sonpeth
Pin-431516



वाटतात; पण [illegible] प्रश्नांना जाग जाणून समग्र शोषित, बहुजनांच्या मनांना हलवून जागृत केले. तथाकथित इतिहासांतर्गत दडविलेला आणि दडपलेला इतिहास वाङ्मयाच्या, साहित्याच रचनेतून, परिभाषेतून उलगडून दाखविला." बळी हा एतद्देशीयांचा वंशज आणि वामन हा बाहेरून आलेल्या आर्यांचा वंशज या दृष्टीने अवतारकथेची चिकित्सा करून बहुजनांचा इतिहास कसा चुकीचा लिहिला हे ते दाखवितात.

चातुर्वण्य, जातीयता, अस्पृश्यता ही ईश्वरनिर्मित नूसन वरिष्ठवर्णीयांच्या स्वार्थबुध्दीतून तिचा उगम झालेला आहे. ब्राम्हण यास जबाबदार असल्यामुळे त्यांनी ब्राम्हणांच्या सांस्कृतिक मक्तेदारीवर हल्ला चढवल्याचे डॉ.योगेन्द्र मेश्राम नमूद करतात. ते लिहितात, "चातुर्वण्य व जातिभेद ह्या सामाजिक संस्था माणसाने निर्मिल्या असून त्या निर्माण करण्यात त्याचा स्वार्थ आहे; पण आपल्या वर्चस्वाला अधिकारभावनेला कायम रूप देण्याकरिता त्याने ह्या संस्था ईश्वरनिर्मित आहेत, असे हेतुपुरस्सरपणे दाखविले. म्हणुनच बुध्दिवादी व मानवतेचा कैवारी म.फुले यांचा राग या ब्राम्हणी कारस्थानावर, ब्राम्हण्यावर होता. त्यांनी ब्राम्हणनिर्मित धर्मग्रंथ, चातुर्वण्य, आणि तद्भूत जातिभेद व आर्थिक हल्ला चढविला." त्यांचा तो हल्ला विशिष्ट जातीतील व्यक्तींवर नव्हता, तर तो प्रवृत्तीवर होता.

त्यांची तळमळ, प्रेम, करूणा माणूस म्हणून अंती सर्वांबद्दल सारखीच होती. परंतु, शूद्रांची चळवळ म्हणून जाणीवपुर्वक म.फुलेंच्या चळवळीकडे वरिष्ठवर्णीयांनी दूर्लक्ष केल्याचे आंबेडकरवादी विचारवंत अविनाश डोळस म्हणतात. ते लिहितात, "आधूनिक भारतात प्रथम जातीअंताची भूमिका मांडणारी म.फुल्यांची चळवळ हीच खरी प्रबोधनाची चळवळ होती. ती केवळ शुद्रांची चळवळ म्हणून ब्राम्हणांनी आपली म्हणून स्वीकारली नाही. जातीपलीकडे मानवी प्रश्न म्हणून म.फुल्यांनी ब्राम्हण स्त्रियांच्या केशवपनाविरूध्द नाभिकांचा संप घडविला, विधवाविवाह घडवून आणले. व ज्या ब्राम्हण विधवा स्त्रिया घरातीलच पुरूषांच्या वासनेच्या शिकार बनल्या. त्यांच्यासाठी त्यांनी प्रसूतिगृह काढून माता म्हणून तिला पहिल्यांदा प्रतिष्ठा मिळवून दिली. कुमारी माता व विधवा माता ही कल्पना आपल्याकडे नाही. कुठल्याही स्त्रीकडे ती माता आहे म्हणून पाहून तिला महत्व देण्याचा प्रयत्न म.फुल्यांनी केला." माणूस म्हणून स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्यातून प्रत्ययास येतो. त्यामुळे ते भारतातील व्हॉल्टेअर म्हणून म.फुलेंचा उल्लेख करतात.

शिक्षण हे समाजसुधारणेचे मूळ असल्यामुळे म.फुले सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षणावर भर देतात. स्त्री आणि अस्पृश्यांच्या विकासासाठी त्यांनी त्यांना शिक्षणाची दारे खुली केली. याबाबत केशव मेश्राम म्हणतात, "शूद्रातिशूद्रांच्या मुलींसाठी शाळा सुरू करणारा पहिला भारतीय असे म.फुले यांचे वर्णन करावे लागेल. स्त्रीशिक्षण, हा भारताच्या अवनतीवरचा तोडगा मानणारा विचारवंत आणि त्यांच्या हक्कांबद्दल व स्त्रियांच्या स्वातंत्र्याबद्दल आवेगपूर्ण कृती करणारा महापुरूष, असे त्यांना संबोधावे लागेल." शूद्रातिशूद्रांना विद्यावंचित ठेवल्यामुळेच बहुजन समाजावर गुलामगिरी लादली गेली आणि शतकानुशतके त्यांचे सामाजिक व धार्मिक शोषण होत राहिले. हे सर्व अनर्थ एका अविद्येने केल्यामुळे 'विद्या शिकताच सुखी व्हाल' असा संदेश देऊन त्यांनी शूद्रादिशूद्रांत विद्येबद्दल आत्मविश्वास निर्माण केला.

भारतातील प्रमुख व्यवसाय शेती; पण या शेती आणि शेतीव्यवसायात गुंतलेल्या शेतकऱ्यांविषयी सर्वप्रथम म.फुलेनींच विचार मांडले. एकूण भारतीय परंपरेत शेती आणि शेतकऱ्याचा गंभीरपणे विचार म.फुले यांनीच केला, असे नागनाथ कोत्तापल्ले नमूद करतात. ते म्हणतात "महात्मा फुले हे एकमेव असे समाजचिंतक आहेत की, ज्यांनी प्रथमतःच शेतकऱ्याचे प्रश्न समजावून घेतले. नुसते समजावून घेतले असे नाही तर या प्रश्नांबद्दल एक सहानुभूतिपूर्ण मानवतावादी दृष्टिकोन त्यांनी प्रकट केला." हिंदुस्थानातील शेतकऱ्यांचे जिणे मातीमोल होण्यास येथील धर्मव्यवस्था, ती राबविणारा ब्राम्हणवर्ग व सत्ताधरी इंग्रज यांना त्यांनी जबाबदार धरले आहे.

हिंदू धर्माला पर्याय म्हणून महात्मा फुलेंनी बहुजनांसाठी 'सार्वजनिक सत्य धर्मा'ची स्थापना केली. सार्वजनिक सत्य धर्माचे स्वरूप सांगण्यासाठी त्यांनी 'सार्वजनिक सत्य धर्म' पुस्ताकाची निर्मिती केली. निर्मिकाने सर्व प्राणिमात्रांस निर्माण केल्यामुळे त्यांनी परस्परांशी कोणते आचरण करावे, याचा तपशील या ग्रंथात दिला आहे. पूजा, नामकरण, निर्माणकर्ता, धर्मपुस्तक, तर्क, नीती, दैव इत्यादी अनेक विषयांवर सोप्या भाषेत विवेचन केले आहे. दत्ता भगत यांना हा ग्रंथ म.फुलेंच्या चिंतनाचे सार वाटतो. योगेन्द्र मेश्राम या ग्रंथाचे महत्व प्रतिपादन करताना म्हणतात, "हो जोतीरावांचा ग्रंथ 'मानव विषयक संकल्पनें' चे समग्र दर्शन घडवितो. हा ग्रंथ म्हणजे मानवी स्वातंत्र्याचा एक जाहीरनामाच आहे. विश्वकुटूंबवादाची ती एक गाथा आहे.' सत्य व नीती हाच मानवधर्म असल्यामुळे मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर विश्वऐक्यभाव दृष्टीपुढे ठेवून मानवजातीने परस्परांप्रती वर्तन ठेवावे, असे ते नमूद करतात.

आंबेडकरोत्तर आंबेडकरवादी विचारवंतांनी आधुनिक मराठी कवितेचे जनकत्व महात्मा फुलेंना दिले आहे. परंपरा मात्र केशवसुतांना आधुनिक मराठी कवितेचे जनक मानते. आधुनिक जाणिवा व्यक्त

करणारी कविता केशवसुतांनी लिहिली म्हणून त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक मानले जाते. `मानवकेन्द्रित` जाणिवेला आधुनिकता असे म्हटले जाते; परंतु केशवसुतांच्या अगोदर मानवकेन्द्रित जाणिवा करणारी, सामाजिक आशय व्यक्त करणारी कविता महात्मा फुलेंनी लिहिल्यामुळे तेच आधुनिक मराठी कवितेचे जनक होत. असे आंबेडकरवादी विचारवंत डॉ.सा.द.सोनसळे नमूद करतात. ते लिहितात, ``कालखंडाचा विचार करता आणि सामालिक आशयाच्या कवितेचा विचार करता क्रांतिवीर जोतीराव फुले हेच आधुनिक मराठी कवितेचे जनक होत.`` पवाडा छत्रपती शिवाजीराते भोसले यांचा, पवाडा विद्याखात्यातील ब्राम्हण पंतोजी (१८६९) सत्सार -१, सत्सार -२ (१९५८) निमित्ताने लिहिलेल्या कविता, `सत्य सर्वांचे अदिघर` ही सार्वजनिक सत्यधर्म पुस्तकातील सुप्रसिध्द कविता आणि अखंडादी रचना ही त्यांची एकूण कविता जीवनासंबंधी नवा दृष्टीकोन मांडणारी आहे. जिला आधुनिकता असे आपण म्हणतो, मी आधुनिकता त्यांच्या कवितेत ठायीठायी प्रकट झालेली आहे. त्यामुळे महात्मा फुलेंच्या कवितेचा आढावा घेताना, अपुऱ्या संदर्भानिशी इतिहास आला तर नव्या तथ्यावर किंवा साधनावर अन्याय तर होतोच; पण ज्ञानक्षेत्राशी प्रतारणा केल्याचा गुन्हाही घडतो, असा इशारा देऊन नगनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ``केशवसुतपूर्व आधुनिकतेचा ऊर्जस्वल आविष्कार म्हणून महात्मा फुले यांच्या कवितेकडे पाहिल्याशिवाय गत्यंतर नाही, असे सुचवासे वाटते.`` स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय, स्त्री पुरूष, समानता, अस्पृश्यास्पृश्य भेदाचे थोतांड, सत्याची महती, उद्योगप्रियता अशा किती तरी आधुनिक मूल्यांचा त्यांच्या कवितेत समावेश असल्यामुळे आधुनिक मराठी कवितेचे जनक तेच ठरतात.

आंबेडकरवादी विचारवंत दत्ता भगतांनी `मराठी भाषेतले पहिले आधुनिक नाटक - तृतीय रत्न` या संशोधनपर ग्रंथातून म.फुले हे आद्य नाटककार असून `तृतीय रत्न` ही नाट्यसंहिता आहे, हे त्यांनी संहितांतर्गत दाखले देऊन स्पष्ट केले. ते लिहतात, ``हे लेखन नाटक आहे याचं संहितांतर्गत पुरावे तर मी नोंदवले आहेतच; पण म.फुले यांच्या मनात दडून असलेल्या नाट्यलेखकाचेही आपणाला कसे दर्शन घडू शकते याचीही मी नोंद करण्याचा प्रयत्न केला आहे.`` जोशीबुवा, गर्भिणी स्त्री व तिचा नवरा अशी तीन प्रमुख पात्रे या जोश्याचा भाऊ दामू, विदूषक, एक पाद्री असे सहपात्र घेऊन त्यांनी `तृतीय रत्न` नाटकाची निर्मिती केली. ढोंगी ज्योतिशाचे कपटकारस्थान उघड करणे, धार्मिक रीतिवाजामधील भोंदूगिरी चव्हाट्यावर आणो व धर्मभोळ्या लोकमनाला जाग आणणे, हा या नाटकाचा हेतू आहे. या नाटकात महात्मा फुलेंनी जो विषय हाताळला आहे त्यावरून हे केवळ मराठीतले पहिले आधुनिक नाटकच नव्हे तर ते मराठीतील पहिले स्वतंत्र सामाजिक नाटक आहे.

थोडक्यात, अस्पृश्यांचे उध्दारक, स्त्री शिक्षणाचे जनक, स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे आणि हक्कांचे उद्‌गाते, शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडणारे लोकनेते महात्म फुलेंच्या विचारांची मांडणी करण्याचे कार्य आंबेडकरवादी लेखकांनी केले. त्यांच्या लेखनात स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय व मानवी मूल्यांना असलेले महत्व त्यांनी प्रतिपादन केले. आधुनिक मराठीतील पिहिले कवी, पहिले आधुनिक व सामाजिक नाटककार म्हणनही त्यांचे मोठेपणा त्यांनी मांडले. बुध्दिप्रामाण्यावाद व विज्ञानवादी दृष्टिकोनातून महात्मा फुलेंनी केलेल्या धर्मग्रंथांच्या चिकित्सेचे महत्वही त्यांनी प्रतिपादन केले.

## संदर्भ

१. प्रबोधनाच्या दिशा - डॉ.गंगाधर पानतावणे
२. म.फुले समग्र वाड्मय -
३. जोती म्हणे - भास्कर चंदनशिव
४. आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ - अविनाश डोळस
५. म.फुले गौरवग्रंथ - नागनाथ कोत्तापले
६. मराठी कविता आकलन आणि अस्वाद - डॉ.नागनाथ कोत्तापले
७. तृत्तीय रत्न ( मराठी भाषेतील पहिले आधुनिक नाटक) - दत्ता भगत

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani